Vol 6 Issue 10 April 2017 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**


Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University



**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 IMPACT FACTOR : 4.6052(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 10 | APRIL - 2017

GRT GOLDEN RESEARCH THOUGHTS

# किशोरावस्थेतील बालक–पालक सबंधावर होणारा सर्वांगिण परिणाम

प्रा.डॉ. सुचेता पारकर
समाजषास्त्र विभाग प्रमुख ,कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर.

## प्रस्तावना



अव्यक्ततेचा काळ Latency Period संपल्यावर मुले किशोरावस्थेत पदार्पण करतात. हा कालावधी बालकाच्या जीवनात अतिशय महत्वाचा समजला जातो. कारण हयाच काळात मुलांमध्ये शारिरीक व मानसिक परिवर्तन घडून येते. त्यांच्या वृतीत बदल होतो. लैंगिक भावना तीव्र होतात. त्यांच्यावर नियंत्रण ठेवने मुलांना कठीण जाते.

एल कारमाईलच्या मते – किशोरावस्था जीवनाची अशी एक अवस्था आहे की, जिथून एक अपरिपक्व व्यक्ती शारिरिक व मानसिक विकासाच्या शेवटास जात असतो.

'जर्सील्ड' च्या मते' किशोरावस्था काही अवस्था आहे ज्यात एक विकासशील व्यक्ती बाल्यावस्थेतून परिपक्व अवस्थेकडे वळतो. किशोरावस्थेत आज शारिरीक परिपक्वतेसोबतच मानसिक, सामाजिक, काही सार्वत्रिक परिपक्वता आढळून येते. म्हणून आधुनिक युगात आज किशोरावस्थेतील परिपक्वतेच्या अध्ययनाला महत्व प्राप्त झाले आहे. किशोरावस्थेच्या दोन उपव्यवस्था आहेत.

**1) पूर्व किशोरावस्था** (Early Adolescence) ही अवस्था वय वर्ष – 13–14 ते 16–17 पर्यंतची आहे.
मुलींमध्ये ही अवस्था 13 ते 16 या काळात आहे. मुलांमध्ये 1 वर्षे उशीरा आढळते.

**2)उत्तर–किशोरावस्था** (Late Adolescence) मुलींमध्ये ही अवस्था 16–17 ते 20–21 पर्यंत तर मुलांमध्ये 18 – ते 21 वर्षे.

सर्वसामान्यपणे पूर्व किशोरावस्था व उत्तर किशोरावस्थेचा मध्य हा 17 वे वर्षे समजु शकतो. या काळात मुले अकरावी वा बारावीत राहतात. आई वडील मुलांना मोठे समजायला लागतात व मुले ही भविष्याच्या दृष्टीने कॉलेज व व्यावसायीक प्रशिक्षणाला जाण्यायोग्य तयार झालेली असतात.

पुर्व किशोरावस्थेला 'तुफान आणि तणावाचे' वय समजले जाते. (Age of Strom and Stress)- या वयात मुलांचा पालक, शिक्षक, तसेच मित्रांसोबत अनेकदा संघर्ष होतो. त्यांच्यातली संवेगात्मकता वाढते.

किशोरावस्थेलाच संक्रमण काळ (Perod of Transition) म्हटल्या जाते. किशोरावस्था ही बाल्यावस्था तसेच प्रौढावस्थेतील संक्रमण काळ आहे. ज्यांना नवनविन आव्हानांना तोंड दयायचे असते. तेव्हा त्यांच्या काही समस्या देखील आहे. जसे –

## किशोरावस्थेतील समस्या –

1) या वयात पराकाष्ठेची अस्थिरता असते. कधी उत्साहीत तर कधी उदास होतात. सामाजिक संबंधात अस्थिरता जास्त दिसते. विरूध्द लिंगी आकर्षण व मैत्री निर्माण होते.
2) सामाजिक समस्या जास्त असतात. कुटूंबाच्या प्रमाणकांशी जुळवून घेणे कठीण जाते.
3) मुलांच्या समस्या या शाळा, आई–वडील, कौटूंबिक समायोजन, व्यक्तिगत आकर्षण व शिष्टाचारासंदर्भात असतात.
4) बुद्धिमान मुलांपेक्षा सर्वसामान्य मुलांना समस्या जास्त भेडसावतात. कारण ते सहजतेने समायोजन करू शकत नाहीत.

तसे पाहता प्रत्येक अवस्थेतील बालकाच्या समस्या असतातच पण किशोरावस्थेतील समस्या या जास्त दुःखी करणाऱ्या असतात.

किशोरावस्थेतील समस्या बघितल्यावर आपल्याला असे लक्षात येते कि, खालील घटकांचा किशोरावस्थेतील बालक पालक सबंधावर परिणाम होतो.

**1) शारिरीक परिवर्तन –** साधारणतः 10 – 12 व्या वर्षापासुन शरीरात बाह्यता दिसून येणारे बदल हे मुले वयात येऊ लागण्याचे एक लक्षण असतं.

मुलींची शरीररचना मातृत्वासाठी घडलेली. मुलींच्या बाबतीत मासिक पाळी सुरू होणे ही महत्वाची घटना ठरते. मुलींच्या बाबतीत बदल दिसायला लागताच पालक जागृत होतात. तिची कपडयांची निवड, मित्रां बरोबर खेळणे, जाणे याबाबत जरा जास्तच सूचना मिळतात. खर तर ते काळजीनेच सुचना करतात. मनुष्य सोडून सगळया प्राणिमात्रांमध्ये मादीची संमती नसेल तर गर्भधारणा होत नाही, पण स्त्रिला हे स्वातंत्र्य आहेच अस नाही. त्यामूळे नको असतांना लादलेली गर्भधारणा किंवा लैगीक अत्याचाराची टांगती तलवार स्त्रीवर कायम राहीली. यातूनच मुलींची काळजी करणे आले. आणि मुलींना या काळजीपोटी काही माहीती दिली तरी जाते, पण मुलांना मात्र तेही नाही. मुलींच्या बाबतीत काळजी करणारे कुटूंब मुलांच्या बाबतीत उदासीन असतो.

10–11 वर्षापासून अचानक उंची वाढते, पावलांचा आकार वाढते, शरीराच्या तुलनेत हात पाय जास्त लांब, छाती – खांदयाचा भाग रूंदावणे, कंबर बारीकच. थोडक्यात मुलांची शरीराची ठेवणच वेगळी दिसायला लागते. हातून सांडलवंड होने. वेंधळेपणा वाढणे अशा गोष्टी या काळात मुलांच्या हातून जरा जास्तच होऊ लागतात.

शारिरीक बदलासंदर्भात बरीच माहिती समवयस्क मुलांकडून, तेही अर्धवट माहीती त्यातली काही माहीती तुकड्या तुकड्यांनी बनलेली. त्यामुळे मुले गोंधळतात. मुलगा वयात येण हा विषय अनेक बऱ्याच कुटूंबामध्ये जणू ऑप्शनलाच टाकलेला असतो. त्यांच्या लैंगीकतेचे सगळ स्वरूपच अळीमिळी गुपचिळी छापाच आहे. त्यामुळे दडपण, अस्वस्थता, अवघडलेपणा, आणि भिती कायमचीच त्याच्याशी जोडलेली आहे.

मुलांच्या मनावरच्या या ताणतणावाचं आई – बाबांनी भान जागं ठेवल्यानेही त्यांच्या देहबोलीत खूप फरक पडतो. आई–वडिलांचा आश्वासक आणि परिपक्व दृष्टीकोण मुलाचा आत्मसन्मान कायम ठेवण्यात खुप मोठी भूमीका बजावू शकतो.

***2)भावनिक परिवर्तन :–*** शारीरिक परीवर्तनाची किशोरांना जाणिव होऊ लागते. त्यांना अनेक प्रश्न भेडसावू लागतात. त्यामूळे कित्येकदा मुले–मुली अंतर्मुख होतात व कोणातही न मिसळता एकटेच राहावे अशी भावना त्यांच्यात निर्माण होते. ते स्वतः बद्दलच विचार करू लागतात. ते उद्विग्न व लहरी होतात. थोडीशी थट्टामस्करी केली तरी त्यांना राग येतो. व रागाच्या भरात दुसऱ्या व्यक्तीला ताडकन बोलतात हया मनोवृत्तीमुळे गटातील आकर्षण कमी होऊन एकांतवास अधिक आवडू लागतो. स्वविषयक कल्पनेचा योग्य प्रकारे विकास होऊ शकतो, परंतु त्यांना अयोग्य वागणूक मिळाल्यास त्यांच्या स्वतःबद्दलच्या असलेल्या कल्पनांना धक्का बसतो. आपण उपेक्षित आहोत, हि भावना प्रबळ होऊ लागते. मुले अंतर्मुख होतात. परंतु जर हया उपेक्षित भावनेबरोबरच मुलांमध्ये आक्रमक वृत्ती असेल तर मुले असामाजिक न होता समाजविरोधक होतात. आपल्या मित्रांची निवड ते काटेकोरपणे करतात.

प्रेमळपणा, सहानुभूती, समजदारपणा, आपल्याबद्दल वाटणारी आस्था व विश्वास हया कसोटीवर मित्रांची निवड होते. विषमलिंगी व्यक्तीबद्दल आकर्षण वाटु लागते व मुले – मुली एकत्र येतात.

या काळात मुलांना भावनात्मक आधार देण्याची गरज असते. मुलांची वैचारीक पातळी समजावून घेणे, आपली मुले आपल्यापेक्षा मोठी आहेत हे समजणे. तसेच स्वातंत्र्य देणे आणि घेणे ही फार कठीण गोष्ट आहे. स्वातंत्र्य मानवी जीवनाला मानवीपण देणारे मूल्य आहे हे समजून घेणे, मुलांच्या प्रत्येक गोष्टीत दखल अंदाजी न करने व मुख्यत्वे त्यांच्या प्रत्येक कृतीकडे संशयाच्या भावनेने न बघणे, त्यांच्या मित्रमंडळीत मधे मधे न करने, अशी काही पथ्ये पालकांनीही पाळणे आवश्यक आहे.

पालक अतिशय गुंतून पडल्याने मुलांमधील निर्णय क्षमता तर नष्टच होते पण 'त्यांच' म्हणून स्वतंत्र्य व्यक्तिमत्वही चुरगळून जातं. एक व्यक्ती म्हणून स्वातंत्र्य देण्याची खूप गरज आहे. 'मुलांनी मुलांचे निर्णय घ्यावेत'' या भूमिकेला पाठिंबा मिळायला हवा ''आमची मुलं आमच्या शब्दाच्या बाहेर नाहीत'' हा अभिमान आम्हाला सुखावतो पण माणूस म्हणून विकासाच्या दृष्टीने हे घातकच नव्हे काय? आपल्या मुलांना त्यांच्या वाढत्या वयाबरोबर काय काय येत हे आपल्याला तरी कुठ माहित असतं म्हणून बरेचदा विसंवाद होतो.

***3) नैतिक परिवर्तन :–*** बाह्यनियंत्रणाकडून आंतरनियंत्रणाकडे वाटचाल होते. त्याचप्रमाणे बाह्य शिस्तीपेक्षा स्वशिस्तीचे प्राबल्य अधिक असते. हया अवस्थेमध्ये आंतरीक बदल प्रामुख्याने आढळतात कारण नैतिक संकल्पना विकसित झालेल्या असतात आणि नैतिक संहितेमधील लवचिकता त्यांच्या लक्षात येते. या अवस्थेत वैयक्तिक नियम आणि सामाजिक नियम यामध्ये तफावत आढळल्यास किंवा प्रौढ व्यक्तींच्या भाषा, कृती आणि अपेक्षा यांच्यामध्ये तफावत आढळल्यास मुलांच्या मनात संघर्ष निर्माण होतो आणि नैतिक विकासामध्ये बाधा निर्माण होऊ लागते. अपराध आणि लज्जा यामुळे वर्तनाला लगाम घातला जातो. आणि योग्य वर्तनाची वाटचाल होते. अपराधीपणाची भावना आंतरिक असते. त्यामूळे लज्जेपेक्षा (बाह्य स्वरूपाची) अधिक परिणामकारक ठरते. आई–वडिलांच्या विचारामध्ये विषमता असेल तर मुलगा कोणाचे ऐकावे – कोणाचे नाही हया संभ्रमात पडतो. आई–वडिलांचे घर म्हणजे त्याच्यासाठी एखादा कैदखानाच असतो. अशा मुलांना मनाची शांती मिळत नाही. ती सतत चिंताग्रस्त दिसतात. त्यांना पालकांबद्दल आदर वाटेनासा होतो. अशी मुले वाईट मार्गाला लागण्याची शक्यता जास्त असते, त्यांची नैतिक पातळी घसरते, शिक्षणात रूची वाटत नाही, चोरी करने, खोटे बोलने, मारामारी करने, सिगारेट ओढणे, जास्तीत जास्त वेळ घराबाहेर घालवणे अशा वर्तन समस्या मुलांमध्ये आढळतात.

अशा परिस्थितीत पालकांना संयमाने वागने आवश्यक ठरते. प्रत्येक वर्तनामागची कारणे शोधने, मुलांसोबत चर्चा करणे, त्यांचे विचार जाणून घेणे, एवढेच नाही तर स्वतः मध्ये सुधारणा करणे आवश्यक ठरते. मुलांच्या मित्र–मैत्रिनी कोण–कोण आहेत हे तपासणे गरजेचे ठरते. कारण अशी मुले पुढे समाजाकरीता समस्याग्रस्त ठरू शकतात. तेव्हा आई–वडिलांनी शांत चित्ताने विचारपूर्वक तोडगा काढुन – तसेच आपआपसातील मतभेद मिटविणे गरजेचे आहे.

***4) सामाजिक परिवर्तनः–*** कौटूंबिक व शालेय वातावरणाचा मुलांवर जितका परिणाम होतो. तेवढाच सामाजिक वातावरणाचा होतो. सामाजिक वातावरणात घराच्या आसपासचा परिसर, शेजारी, मुलांचे मित्र हया सर्वांचा समावेश होतो. हे सभोवतालचे सामाजिक वातावरण जितके सुसंस्कृत, सुशिक्षित, आपुलकीचे, सहकार्याचे तितके ते मुलांच्या सर्वांगिण विकासाला पोषक ठरते. जर सामाजिक वातावरण दुषित असेल तर त्या वातावरणाचा मुलाच्या जीवनावर वाईट परिणाम होतो. मुलांसमोर जर सतत शिवीगाळ करणारे, दारू सिगारेट पिणारे, जुगार खेळणारे, आपआपसात मारामारी भांडणे करणारे जर असतील व घरातले वातावरण चांगले असेल तर बाह्य वातावरणाचा मुलाच्या मनावर परिणाम होऊन वर्तन समस्या निर्माण होईल. तो सतत मानसिक तणावात राहील. पालकांची शिकवण चांगली की बाहेरील वातावरणात आपण इतरांच्या संगतीत राहुन जे पाहतो – ऐकतो त्याचा स्वीकार करणे योग्य हयाचा तो सारासार विचार करू शकत नाही. बाहेरील वातावरणाचा परिणाम त्याच्या वर्तनात दिसला तर ते पालक सहन करू शकत नाही. त्याला शिक्षा केली जाते. घरात छोट्या – मोठ्या चोऱ्या करणे, चोरून अश्लील सिनेमे पाहणे. मोठ्यांचा अनादर करणे खोटे बोलणे, शिवीगाळ करने इ. दुर्गुण मुलांना जडू शकतात.

तसेच किशोरावस्थेतील मुलामुलींमध्ये काही सामाजिक बदल हे आपोआपच होतात जसे.

1) समवयस्कांमध्ये राहणे जास्तीत जास्त आवडते.
2) पालकांनी दिलेला सल्ला अजिबात आवडत नाही.
3) आपली मतं विचार समाजात, कुटूंबात, गटात प्रस्थापित करण्याचा ठाम प्रयत्न.
4) समान अभिरूची, मुल्य, अभिवृत्ती असणाऱ्या लोकांबरोबर मैत्री करणे आवडते.
5) स्वकल्पना, स्वप्रतिष्ठा प्राप्त करण्याच्या दृष्टीने समाजात मिसळण्याचा प्रयत्न करतात.
6) स्वतःच्या गरजा, क्षमता, आस्था, व्यवसाय शोधण करण्याचा प्रयत्न. सामाजिक घटकांमधून केला जातो.

तेव्हा अशा परिस्थितीत पालकांनाही स्वतःहा काही बदल करायला पाहीजे. आपल्याला ज्या गोष्टी करता येत नसतात त्या आपल्या मुलांना

माहीत असतात. त्यांना त्या गोष्टी करता येतात. आपण ज्या गोष्टी शिकायला सुरूवात करायची जसे मोबाईलमधले बाकी फंक्शन, इंटरनेट, कंम्प्युटर इ. त्यात आपल्याला उगाचच मोठेपण वाटतं. त्या मुलांच्या दृष्टीने अगदी क्षुल्लक असतात. आपण शिकायचा आव आणतो तेव्हा मुले मनोमन हसतात. कारण 'या शुल्लक गोष्टी आहेत, तुम्ही शिकल्याच पाहिजे' असे त्यांना वाटते. व मुलांचे विचार आपल्यापेक्षाही प्रगत असू शकतात. याची जाणीव पालक म्हणून आपण ठेवतो का?

त्यांच्या दृष्टीने त्यांची मते ठाम असतात. जसे मुलांना एखादा अभ्यासक्रम वा गाडी घ्यायची असेल तर ते आपल्या मतांवर ठाम राहतात. जेवढा आपण विरोध करू तेवढे ते आपल्या मताशी अधिक घट्ट होतात. किशोरांमध्ये आत्मविश्वास, जिद्द, करारीपणा त्यांच्या चेहऱ्यावर जाणवतो पण –

1) हेच वय असं, ज्या वयात आयुष्याचं ध्येय ठरवायच तर ठरते.
2) हेच वय असं, म्दरवल करण्याच्या विचारानं पाय घसरतो नि व्यसनाधिनताही येते.
3) हेच वय असं, जगाच्या कक्षा रूंदावतात, पंखात बळ येत नि आभाळ अपूरं पडतं पंखांना.
4) हेच वय असं, जगायची धडपड, सगळयात पुढ जायची ओढ निर्माण होते.
5) हेच वय असं, मत घडत बनतं, ठाम होत. आग्रही स्वभाव आक्रमकही बनतो.
6) हेच वय असं, नव्या नव्या धाडसांच, धैर्याच, प्रभाव पाडण्याच आणि आकर्षित करण्याच.

*आर्थिक परिवर्तन –* याचा किशोरांवर फार मोठा, चांगला व वाईट परिणाम होतो. मुलगा वा मुलगी मुकूलती एक असेल तर सर्व अपेक्षा हट्ट पूर्ण होत असतील तर त्याचाही विपरीत परिणाम त्यांच्यावर होतो. तसेच आर्थिक परिस्थिती जर चांगली आहे, तर मुलांना ज्या शिक्षण क्षेत्राकडे जायचे असेल तिथे जाता येते. त्यांना नवनवीन क्षेत्रे व संधी उपलब्ध करून दिल्या जाऊ शकतात याचाही किशोरांच्या व्यक्तीमत्वावर चांगलाच प्रभाव पडतो. पण अतीलाड, अती पॉकेटमनी देणे, पैसा खुप आहे म्हणून मुले कुठे खर्च करीत आहेत याकडे दुर्लक्ष करणे. हे कित्येकदा अंगलटी येऊ शकते. कारण यातुनच ड्रग्जचे व्यसन लागलेले दिसते.

जर कुटूंबाची आर्थिक परिस्थिती गरीबीची असली तर पालक आपल्या मुलांच्या बऱ्याचशा गरजा पूर्ण करू शकत नाही परंतु जेवढे शक्य आहे तेवढे मुलांकरीता करण्याचा प्रयत्न करावा म्हणजे इतर मुलांजवळ असलेल्या वस्तुंचा हेवा वाटणार नाही. त्यांच्या वस्तू – चोरी करणारी प्रवृत्त होणार नाही. कित्येकदा आर्थिक परिस्थिती जेमतेम असली व मित्र–मैत्रिणी सधन घरातली असली की मुलांमध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण होते.

आपल्या आर्थिक परिस्थितीची कल्पना किशोरांना दयावी. म्हणजे ते विनाकारण महागड्या वस्तुंचा हट्ट करणार नाहीत. कारण या वयात नव्या फॅशनप्रमाणे कपडे, मोबाईल, शुज, चप्पल, दागिने, गाडी ई. सर्व गोष्टी आपल्यापाशी पाहिजेत, ही भावना प्रबळ असते. या वयात मित्र मैत्रिणींचा पगडा जास्त असतो. मागण्या जास्त असतात. हॉटेलिंग, सहली, चित्रपट, यासाठी मित्रमैत्रिनींच पाहीजे असतात. तेव्हा पॉकेटमनी देतांना त्यांनी पैसे कशासाठी खर्च केले हयाचा तपशील लिहून ठेवण्यास सांगावे. त्यामूळे त्यांना हिशोब लिहायची सवय तर लागेलच शिवाय पैशाचा विनियोग मुले कशी करतात हे पण कळेल. त्यांना पैशाची किंमत कळायला पाहीजे. त्यांनी मागितले तेच पैसे देत गेल्यास त्याची किंमत राहात नाही. आई बाबा म्हणजे पैसे काढून देणारी ए. टी.एम. सेंटर्स नाहीत.

*6) तांत्रिक व अन्य परिवर्तन :–* आज तांत्रिक उपकरनांचा वापर ज्या प्रमाणात केला जातो म्हणजे किशोरांच्या दृष्टीने, मोबाईल, इंटरनेट, कंम्प्युटर व गाडी (बाईक) इ. वरील सर्वच बाबी अतिशय उपयुक्त आहेत पण योग्य प्रमाणात वापर केल्यास. किशोर व तरूणांना या सर्वांचेच व्यसन लागले आहे.

मोबाईल :– पालक केव्हाही मुलांशी संवाद साधता यावा, मुले कुठे आहेत ती कळावी या उद्देषाने मोबाईल देतात. पण याचे चित्र उलटेच दिसते. दारू, सिगारेट, गुटख्याप्रमाणेच मोबाईलचेही व्यसन किशोरांना लागलेले आहे. गरजेचे रूपांतर व्यसनता झाले आहे. प्रत्यक्षातील सबंधाऐवजी मेसेज, एअरफोन लावुन बोलने, गाणे ऐकणे यामूळे सामाजिक संपर्क कमी होत आहे. इअरफोन लावून गाणे ऐकण्याचे व्यसनाने दोन मुलांचा रेल्वेरूळावरून जातांना मृत्यु झाल्याचे सर्वांनी टी.व्ही. वरून एकलेच असेल. इअरफोन मुळे पाठीमागून येनाऱ्या ट्रेनचा त्यांना आवाजच ऐकु आला नाही.

टी.व्ही. – दुसरे महत्वपूर्ण व्यसन टी.व्ही. चे टी.व्ही. पाहतांना आजुबाजुंचेही भान नसते. तसेच आई वडील बाहेर कामानिमित्त तर मुले घरी केबलवर काय पहात आहेत. याचीही काळजी पालकांना असतेच. केबल बंद करता येत नाही. मुले नाराज होतात. किंवा आपण रहात नाही तेव्हा मुलांना विरंगुळा पाहीजे हा हेतू पण त्यामागे असतो. अर्धनग्न कपडे, अश्लील हावभाव असणारी गाणी, काही विशिस्ट चॅनल्स याचा किशोरांवर वाईटच परिणाम होतो. पालकांपुढील ही फार मोठी समस्या आहे. पण याबाबत पालकांनी मुलांसोबत सबुरीने चर्चा करूनच प्रश्न सोडवणे आवश्यक ठरते कारण बऱ्याच बाबतीत किशोर वरचढ ठरण्याची शक्यता असते.

कम्प्युटर व इंटरनेट – याने आम्ही बाहेरच्या जगात प्रवेश करतो वा बाहेरची अमर्याद माहीती केवळ काही बटनांच्या सहाय्याने आपल्यापर्यंत पोहचते पण याचेही व्यसन किशोरांना आहे. कितीतरी वेळ नेटसर्फिंग करणे, चॅटींग करणे, पोर्नोग्राफीक व अश्लील चित्रपट पाहणे, गेम्स खेळणे, याप्रकारच्या वाईट मार्गाचे ते अनुसरण करतात. कारण एकच उत्सुकता, पण याचे रूपांतर व्यसनता कधी होते ते कळतच नाही. वारंवार इमेल तपासण्याचाही नादच लागतो. तांत्रिक शोधांचा उद्देष चांगला असला तरी त्याचा वापर मात्र वाईट गोष्टींसाठीच केला जातो हे सत्य आहे.

*बाईक (गाडी) :–* पालकच मुलांना त्रास होऊ नये कारण त्यांना क्लासेस शाळा कॉलेज इ. सर्व कसरत करावी लागते. म्हणून बाईक घेवून देतात. पण हात सोडून, अतिशय वेगात चालविणे, त्याची स्पर्धा लावने. तसेच शास्त्रशुध्द तंत्र माहित नसतांना बाईकचे खेळ खेळले जातात. अनेकदा ते जीववर बेततात. कोणत्याही कारणासाठी जमिनीला पायच लावायचा नाही की काय असे वाटण्याइतका त्या बाईकचा टुव्हीलरचा वापर किशोरांमध्ये वाढला आहे. गरजेची सीमा ओलांडून त्याचे व्यसन कधी होते ते लक्षातही येत नाही.

यासाठी पालकांनीच पैशाचे महत्व समजावून दयावे. जसे की, सायकल वापरण्यास प्रेरीत करून पेट्रोलच्या पैशाचा वापर मुलांकरीताच करायचा. हा पर्यायही आवडू शकतो. वरील सर्व तांत्रीक वस्तु उपयुक्त व गरजेच्या आहेत. पण पालकांनी किशोरासोबत विचार विनिमय करून समजावून व कित्येकदा आक्रमक भुमिका घेऊन का असेना याचे व्यसन घेऊ देऊ नये कारण या काळात पालकांनी जे म्हटले त्याच्या विरूध्द करण्याची प्रवृत्ती पण निर्माण होते.

*बालक – पालक संबंध :–* वरील सर्व परिवर्तनातच बालक पालक संबंध कसे ठेवायला पाहीजेत याचा उहापोह केलाच आहे. तरी सुध्दा काही प्रमाणात कौटूंबिक वातावरण आरोग्यदायी ठेवणे हे पालकाचेच कर्तव्य आहे असे वाटते. कारण खालील काही करणामुळेच त्यापालकांचे किशोरा सोबतचे संबंध बिघडतात. जसे –

1) अतिसंरक्षण
2) नकारात्मक वृत्ती
3) मुलांना असमानतेची वागणूक देणे
4) मुलांकडून अवास्तव अपेक्षा
5) आई – वडीलांची अयोग्य अधिकार वृत्ती आणि कडक शिस्त
6) सर्व मुलांना एकाच साच्यातून वाढविणे.
7) आई वडीलांच्या वागण्यात अनिश्चितता व त्यांच्यातील मतभेद.
8) मुलांमधील दोष लपवून ठेवण्याची वृत्ती.
9) कुटूंबाची सामाजिक व आर्थिक परिस्थिती.
10)दुसऱ्यांसमोर – मुलांमधील दोषांची चर्चा करणे इत्यादी.

***निष्कर्ष –***

वरिल सर्व संशोधनावरून असे लक्षात येते की, पालक व किशोर सबंधाबाबत साधारणपणे असे समजते की –
1) दोन पिढ्या आपापला काळ सोडायला तयार नसतात.
2) दोन्ही पिढ्यांना वाटत आपण म्हणू तसे समोरच्यान वागावं.
3) आपला आग्रह हट्ट बनतो नि तो दुसऱ्यांवर लादला जातो.
4) प्रत्येकालाच वाटतं मी सांगतो तेच, नी माझंच बरोबर.
5)दोन पावलं मागं सरकायला कुणीच तयार नसत.

***समारोप –***

तेव्हा बदलत्या काळानुसार बदलत्या गरजा, आव्हानं, स्वरूप समजूण घेण्याचा पालकांनी प्रयत्न करणे. आग्रह न करता सुचवणे, परिणामांची जाणिव सौम्य शब्दात करून दिली तर मुलेही ऐकतात. तेव्हा मुलांच्या पातळीवर येऊन मुलांचे मित्र होऊन विचार – विनीमय संवादी सूरातून करणे चांगले. आपल्या काळातले रडगाने गाऊ नये. किशोरांना काही समजत नाही असे समजून सतत सल्ले देने सोडावे.

आजची किशोरावस्था जागतिक पातळीवर आल्याने सांस्कृतिक सरमिसळ झालीय. त्यामूळे मुलांच वागण, आवडी निवडी मिडियावर अवलंबून आहे. मुलांची जीवनपध्दती आपल्याशी जुळली नसली तरी समजून द्यायला हवी. निरर्थक सक्ती चालायची नाही.

सरते शेवटी असे म्हणावेसे वाटते की, पालक व बालक या दोघांचेही एकत्रित समुपदेशन करने गरजेचे आहे. जेणे करून दोघांच्याही उणीवा, गरजा एकमेकांसमोर येतील व त्यातून पालक बालक सुसंवाद निर्माण होईल.

***संदर्भग्रंथसूची***


1)बालविकासशास्त्र – डॉ. सौ. ज्योती गायकवाड
पेज नं. 288, 295, 329 श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
2) संवाद तरूणाईशी – रेणू दांडेकर (मनोविकास प्रकाशन) पुणे.
पेज नं. 86, 33, 50, 35
3) बालविकास – डॉ. नलिनी वराडपांडे
पेज नं. 219, 306 पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.
4) बालविकास – डॉ. जानकी मुरजानी
पेज नं. 187, 413 अविष्कार प्रकाशन जयपूर
5) जगप्रसिध्द व्हा – डॉ. अरूणा कौलगुड
पेज नं. 50, 51 मेहता प्रकाशन पुणे
6) तुमची मुले – प्रतिभासंपन्न बाळे – वनराज मालवी
पेज नं. 247 सेल्फ डेव्हलपमेन्ट पब्लिकेशन मुंबई.
7) टी.व्ही आणि मुले – डॉ. अलका वाडकर
पेज नं. 47 उन्मेश प्रकाशन पूणे
8) अनघड अवघड – मिथिला दळवी
मुलगा आहे म्हणून लोकसत्ता – चतुरंग दि. 7 / 7 / 12
9) बालविकास आणि बाल संगोपन – डॉ. मिनाक्षी तारणेकर
पेज नं. 195, विश्व पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रब्यूटर्स, नागपूर.
10) तुम्ही अन तुमची मुलं – नार्थकोट पार्किन्सन / एम. के. रूस्तमजी
पेज नं. 111 अनुवाद – अविनाश भोगे

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org